महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय
**स्मार्ट सिटी अभियान, अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)**
मित्तल टॉवर, ए विंग, ३ रा मजला, फ्रि प्रेस जरनल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई-४०००२१
दुरध्वनी क्र.०२२ - ६२३७७०३१ ई-मेल: executivedirector.jnnurm@gmail.com

पत्र क्र.राअस/SMM/सि.को./नियुक्ती /2116 /१७-१८
दिनांक :- ०६/१०/२०१७

प्रति,

श्री. स्टॅलीन अर्जून आडे,
मु.पो. साईनगर.ता.किनवट,
जि.नांदेड.

**विषय - "सिटी को-ऑर्डिनेटर" या कंत्राटी पदाच्या निवडीबाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०१८" करिता कंत्राटी तत्वावर आपली निवड **"सिटी को-ऑर्डिनेटर"** म्हणून करण्यात येत आहे. सदर पद पूर्णतः कंत्राटी तत्वावर ठोक परिश्रमिकावरील असल्याने, नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणत्याही सेवा-सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाहीत.

आपली निवड **औरंगाबाद** विभागातील **परभणी महानगरपालिका** करिता आपण रुजू व्हाल त्या दिनांकापासून ते दि.२८ फेब्रुवारी,२०१८ रोजी पर्यंत करण्यात येत आहे. सदर स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेमध्ये आपण दि.१०/१०/२०१७ पूर्वी रुजू व्हावे. आवश्यकतेनुसार आपल्या पदस्थापनेच्या ठिकाणात बदल केला जाईल.

सदर स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेमार्फत आपणास दरमहा ठोक परिश्रमिक रु.३०,०००/- (अक्षरी-तीस हजार मात्र) अदा केले जाईल.

आपणास सोबत जोडलेल्या अटी व शर्ती मान्य असल्यास विहीत मुदतीत रुजू व्हावे. रुजू होत असल्याबाबतची तारीख या कार्यालयास ई मेलव्दारे कळवावी. आपण विहीत मुदतीत रुजू झाला नाहीत, तर आपणास सदर पदी काम करण्यास स्वारस्य नाही, असे समजून आपली निवड रद्द समजण्यात येईल.

(सीमा ढमढेरे)
कार्यकारी संचालक

प्रत :

१) आयुक्त, परभणी महानगरपालिका, जि. परभणी.
२) उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
३) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.